श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर.

**सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेबाबत.**

श्रीचे अलंकार व भेट स्वरूपात येणारे सोने व चांदी दागिने तसेच रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेकामी शासनमान्य विमा कंपन्यांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. या संबंधीची माहिती, अर्जाचा नमुना, अटी व शर्ती तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमुना फॉर्ममध्येच प्रस्ताव सादर करणेचा आहे. सिलबंद प्रस्ताव कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दि.२१/०९/२०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावे. प्राप्त प्रस्ताव दि.२२/०९/२०१७ रोजी संत तुकाराम भवन येथे स.११.०० वा. उघडले जातील.

क्र.आस्थापना/का.वि./११२४/२०१७ दि.१४/०९/२०१७ स्वा/-

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६ – २२४४६६)

## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेबाबत.

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. नमूना फॉर्म कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक **सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेकामी** भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

२. सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | अंदाजित रक्कम रू. |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | भेट स्वरूपात प्राप्त झालेले सोने. | २४ किलो. | ३,०८,३७,१८३ |
| २ | भेट स्वरूपात प्राप्त झालेली चांदी. | ८०० किलो. | १,१०,०२,९३३ |
| ३ | रोख रक्कम वाहतुकीची एकावेळी जास्तीतजास्त अंदाजे रक्कम. (वाहतुक :— मंदिर ते बॅक) | — | ३५,००,००० (यात्रा कालावधी सोडून जास्तीतजास्त रोख रक्कम = रू.२,५०,०००) |

३. दरपत्रकात नमुद दर जीएसटी दरासहीत नमुद करावा. इतर अतिरिक्त कोणताही खर्च कंपनीस दिला जाणार नाही.

४. सदर विमा एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील. समितीस आवश्यक वाटल्यास सदर विमा पॉलीसीचे नुतनीकरण करण्यात येईल.

५. मंदिर समितीकडील सोने चांदी अथवा रोख रक्कम चोरी अथवा गहाळ झाल्यास विमा कंपनीकडून तातडीने विमा पॉलीसीचा लाभ मिळणे आवश्यक आहे. यासाठी विमा कंपनीकडून कोणत्याही जाचक अटी मंदिर समितीवर लागू होणार नाहीत.

६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ती कंपनीवर बंधनकारक राहील.

७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस विमा कंपनीस जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

——//——

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**दरपत्रक फॉर्म**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :— **सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेकामी.**

पूर्ण नाव :— ----------------------------------------
पूर्ण पत्ता :— ------------------------------------------
------------------------------------------

मोबाईल क्रं. :— ------------------------------------------

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेकामीची दि.१५/०९/२०१७ रोजीचे दै. पुण्यनगरी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर दरपत्रकाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित रक्कम रू. | विमा रक्कम रू. | वार्षिक विमा हप्ता रक्कम रू. (Besic Rate + GST) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | भेट स्वरूपात प्राप्त झालेले सोने (२४ किलो) | ३,०८,३७,१८३ | | |
| २ | भेट स्वरूपात प्राप्त झालेली चांदी (८०० किलो) | १,१०,०२,९३३ | | |
| ३ | रोख रक्कम वाहतुकीची एकावेळी जास्तीतजास्त अंदाजे रक्कम. (वाहतुक :— मंदिर ते बॅक) | ३५,००,००० (यात्रा कालावधी सोडून जास्तीतजास्त रोख रक्कम = रू. २,५०,०००) | | |
| | एकूण | | | |

वरीलप्रमाणे सोने चांदी दागिने व रोख रक्कम वाहतुकीचा विमा उतरविणेकामी वार्षिक हप्ता आहे. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. त्यानुसार आमच्या विमाकंपनीकडून सदरची विमा पॉलीसी उतरविण्यास विनंती आहे.

दिनांक /०९/२०१७ नाव, सही व शिक्का

<u>सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.</u>

१. आवश्यक असलेल्या शासकीय परवान्यांच्या प्रती.
२. पॅनकार्ड.
३. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.